**ठळक बातम्या**

- भारत आणि न्यूझीलंड येत्या ४ वर्षात द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवणार

- भविष्यातल्या परिवहन प्रणालीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ब्रिक्स देशांमध्ये सहमती गरजेची असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं मत

- व्हिएतनाममध्ये बोट दुर्घटनेत १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू

- इंग्लंड विरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय महिला संघाकडे पहिल्या डावाअखेर ११५ धावांची आघाडी

**आणि**

- फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आज नॉर्वेचा सामना इंग्लंडबरोबर/ अर्जेंटिनाची लढत स्वित्झर्लंडसोबत होणार

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडने २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्धार केला आहे. तसंच दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचं ठरवलं आहे असं, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांच्यात ऑकलंडमध्ये झालेल्या चर्चेची माहिती त्यांनी वार्ताहरांना दिली. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज संरक्षण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय, पर्यटन, क्रीडा आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले.

यानंतर प्रधानमंत्र्यांनी न्यूझीलंडमधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. न्यूझीलंडमधला भारतीय समुदाय हा दोन्ही देशांमधल्या भागीदारीचा एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, असं प्रतिपादन त्यांनी आपल्या संबोधनात केलं. दोन्ही देशांसमोर संधींचा अथांग महासागर असून ही भागीदारी अधिक उंचीवर नेण्यासाठी दोन्ही देश सज्ज असल्याचं मोदी म्हणाले. भारत आणि न्यूझीलंड संबंधांविषयी मोदी म्हणाले…

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

यावेळी न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन म्हणाले की, मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी झाल्यामुळे न्यूझीलंडच्या निर्यातदारांसाठी १ अब्ज ४० कोटी लोकांची बाजारपेठ खुली झाली आहे. तसंच न्यूझीलंडमधल्या भारतीय व्यवसायांसाठीही नवीन संधी निर्माण झाल्याचं लक्झॉन म्हणाले.

या भेटीनंतर आपला न्यूझीलंड दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भारतात परतण्यासाठी रवाना झाले.

**<><><><><>**

शाश्वत, लवचीक आणि भविष्यवेधी परिवहन प्रणालींच्या निर्माणासाठी ब्रिक्स देशांमध्ये दृढ सहकार्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात केलं. भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांच्या तिसऱ्या बैठकीचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. ही बैठक नव्या अर्थव्यवस्थांमध्ये परिवहन क्षेत्र मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचंही ते म्हणाले. 'लवचिकता, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता यासाठी उभारणी' अशी या बैठकीची संकल्पना आहे.

परिवहन देशाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे असं सांगत रस्ते, रेल्वे, सागरी आणि हवाई वाहतूक क्षेत्रांमध्ये भारताच्या विकासाविषयी त्यांनी माहिती दिली. या बैठकीची सांगता उद्या होणार आहे.

<><><><><>

भारत आपली पारंपरिक संरक्षण क्षमता आणि प्रगत तंत्रज्ञान अधिक सक्षम करुन एक मजबूत, आत्मनिर्भर आणि भविष्यासाठी सज्ज संरक्षण दलाची उभारणी करत आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टनम इथं आज आय एन एस महेंद्रगिरी या स्वदेशी बनावटीच्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकेचा जलावतरण समारंभ  आणि नौदलात समावेश राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

भविष्यातल्या युद्धांमध्ये कदाचित कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. मात्र युद्ध हे राष्ट्राचा दृढनिर्धार, शूर सैनिक आणि सक्षम लष्करी सामर्थ्याच्या जोरावरच जिंकता येतं असं ते म्हणाले. केवळ दीड वर्षांच्या कालावधीत आपल्या नौदलाच्या ताफ्यात सहा युद्धनौकांचा समावेश झाला असून यातून भारताची जहाजबांधणी क्षमता, संरक्षण उद्योगक्षेत्राचा झपाट्यानं होणारा विस्तार आणि स्वदेशी उत्पादनातली विश्वासार्हता दिसून येते, असं ते म्हणाले.

<><><><><>

लोकशाहीमध्ये मतभेद असणं  हे नैसर्गिक असलं तरी संविधान आणि जनकल्याणाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य असायला हवं, असं मत उपराष्ट्रपती सी.  पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं आहे.  बिहार विधानसभा सदस्यांसाठी

गया जी इथं आयोजित अभिमुखता आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचं उदघाटन आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं स्वीगी इन्स्टामार्ट या कंपनीला नऊ नोटिसा बजावल्या. ग्राहकांना खराब झालेले आणि मुदत संपलेले अन्नपदार्थ पुरवल्याच्या तक्रारीसह अनेक तक्रारी ग्राहकांनी केल्या होत्या. त्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती प्राधिकरणानं समाजमाध्यमांद्वारे दिली. प्राधिकरणानं कंपनीकडून सविस्तर स्पष्टीकरण मागवलं आहे.

<><><><><>

व्हिएतनाम मध्ये फु कोक बेटाजवळ आज स्पीडबोट उलटून  झालेल्या अपघातात १५ भारतीय पर्यटक बुडाल्याचं वृत्त व्हिएतनामच्या व्ही एन एक्सप्रेस या वृत्तवाहिनीने दिल आहे. या स्पीडबोटीवर ३२ भारतीय पर्यटक आणि ४ कर्मचारी प्रवास करत होते. किनाऱ्यापासून ४०० मीटर अंतरावर ही बोट अचानक बुडाल्याने सर्वजण पाण्यात पडले. नौदल आणि तटरक्षक दलाची बचाव पथक येण्याआधीच आसपासच्या काही बोटींनी त्वरित धाव घेऊन अनेकांना वाचवलं, आतापर्यंत २१ जणांना वाचवण्यात यश मिळालं परंतु १५ जण मात्र मृत्युमुखी पडले आहेत .

हॅनोइ इथल्या भारतीय दूतावासाने पर्यटकांच्या कुटुंबियांसाठी एक हेल्पलाईन सुरु केली आहे, तसेच हो ची मिन्ह सिटीतल्या भारतीय वाणिज्य दूतावासाने  नियंत्रण कक्ष सुरु केला असून दोन्ही ठिकाणी  अपघाताबद्दल अद्ययावत माहिती आणि मदत  मिळू शकेल. बोटीवरच्या पर्यटकांपैकी ५ जण

आंध्र प्रदेशचे होते, त्यातले २ जण मृत्युमुखी पडले असून ३ जणांवर उपचार सुरु आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तान सरकारने राबवलेल्या मोठ्या दहशतवादविरोधी मोहिमेत गेल्या रविवारपासून ८८ दहशतवादी ठार झाल्याचं पाकिस्तान सरकारने म्हटलं आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नकवी यांनी आज कराची इथे वार्ताहरांना ही माहिती दिली.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत आज उपांत्य पूर्व फेरीत नॉर्वेचा सामना इंग्लंडशी होणार असून गतविजेत्या अर्जेंटिनाची लढत स्वित्झर्लंडसोबत होणार आहे. या सामन्यांमधून उपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या उर्वरित दोन संघांची नावं स्पष्ट होतील. स्पेन आणि फ्रान्सनं याआधीच उपांत्य फेरीच्या अंतिम चार संघांमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. स्पेननं बेल्जियमवर २-१ असा विजय मिळवून पुढची फेरी गाठली, तर फ्रान्सनं मोरोक्कोवर २-० असा सहज विजय मिळवत आगेकूच केली.

<><><><><>

लंडन मधल्या लॉर्ड्स इथं सुरू असलेल्या महिलांच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघाला पहिल्या डावा अखेर ११५ धावांची आघाडी मिळाली आहे. भारतीय महिला संघानं पहिल्या डावात २८५ धावा

केल्या. पण इंग्लंडचा संघ केवळ १७० धावात सर्वबाद झाला. इंग्लंडकडून एमी जोन्स वगळता इतर कुणालाही अर्धशतकी खेळी सुद्धा करता आली नाही. भारताच्या क्रांती गौडनं ३७ धावात त्यांचे ५ खेळाडू बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दुसऱ्या डावात २६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज वाहतूक कोंडीमुळं उशिरा सुरू झाला. भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या ९ व्या षटकात १ बाद ७८ धावा झाल्या होत्या.

इंग्लंडने ३-० अशी आघाडी घेत मालिका यापूर्वीच जिंकली आहे.

<><><><><>

माद्रिद इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात, आज महिलांच्या कंपाऊंड सांघिक अंतिम फेरीत ज्योती सुरेखा वेन्नम, पृथिका प्रदीप आणि चिकिता तनिपार्थी या भारतीय संघाला कोलंबियाच्या वर्चस्वपूर्ण खेळासमोर २२८ विरुद्ध २३२ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागला आणि त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. या रौप्य पदकासह भारताने या स्पर्धेतलं पहिलं पदक पटकावलं आहे.

//<><><><><>//